मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

# यहज्केलः दृष्टांताचा मनुष्य



लेखक: Edward Hughes

रेखाचित्रकार: Lazarus

रूपान्तरकार: Ruth Klassen

अनुवादक: Rev. Shilas Gavit

निर्माता: Bible for Children
www.M1914.org

©2017 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही तीं कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

फार वर्षांपूर्वी, एका बलशाली सैन्याने यहुदावर स्वारी केली होती, त्यावेळी देवाच्या पुष्कळ लोकांना बाबेल देशात गुलाम करुन नेण्यात आले.



स्वतःच्या देशापासून दुरदेशी, हे यहुदी लोक खबार नदीच्या तीरी राहात होते. त्यांच्यापैकी एक देवाचा सेवक, यहेज्केल संदेष्टा होता.



ऐक दिवशी, देवाने यहेज्केलला एक दृष्टांत दाखवला. अग्निवर्ण जिवंत प्राण्यांच्यामध्ये, प्रखर प्रकाशासारखे देवाचे गौरव प्रकट झाले. प्रत्येक प्राण्याला चार मुखे आणि चार पंख होते.



त्यांच्या वरच्या भागाला चांदव्यासारखे सिंहासन होते, पावसाच्या दिवशी मेघात दिसणाऱ्या धनुष्यांप्रमाणे त्यांच्याभोवती प्रभा भाकलेली होती. यहेज्केलने जेंव्हा हे पाहिले तेंव्हा तो उपडला पडला.



परमेश्वर यहेज्केलबरोबर बोलला. "मी तुला इस्राएल वंशजाकडे पाठवितो. त्यांना माझे वचन सांग, कारण ते बंडखोर आहेत." ग्रंथपट धरलेला एक हात प्रगट झाला.



"हा ग्रंथपट सेवन कर व जाऊन इस्त्राएल घराण्याबरोबर बोल" असे परमेश्वर देवाने त्याला म्हटले. हा काय विचित्र आदेश होता ! परंतू यहेज्केलने आज्ञापालन केले, तो ग्रंथपट सेवन करुन निघून गेला.



परमेश्वराच्या आत्म्याने यहेज्केलला उचलून धरले आणि दुसऱ्या ठिकाणी जेथे खबार नदीच्या तीरी बंदिवान यहुदी राहात होते तेथे नेले. त्या ठिकाणी जे काही त्याने पाहिले ते पाहून तो भयचकित होऊन सात दिवस त्यांच्यामध्ये बसून राहिला.






देवाचे वचन लोकांना स्पष्ट समजावे म्हणून यहेज्केलने पुष्कळ विचित्र गोष्टी केल्या. त्याने एक वीट घेऊन तिच्यावर यरुशलेम नगरीचे चित्र काढले. यरुशलेमच्या अवतीभोवती खूप सैन्य जमा झाले आहे असे चित्र जेंव्हा तो काढत होता तेंव्हा लोक कदाचित त्याच्या पाठीमागून ते पाहात असतील. देवाच्या पवित्र नगरीचा लवकरच नाश केला जाणार आहे हे तो दर्शवित होता.

उत्तरेकडिल इस्त्राएल राज्य, ३९० वर्षे पर्यंत देवाच्या आज्ञांचे उल्लंघन करित राहिले, आणि दक्षिणेकडील यहुदा राज्य, ४० वर्षे. यामुळेच उत्तर इस्त्राएलचा नाश झाला होता आणि आता याच कारणामुळे यहुदाचे देखिल लवकरच पतन होणार होते.



लोकांना त्यांनी किती वर्षे देवाच्या आज्ञा पाळल्या नाही याची आठवण करुन देण्यासाठी परमेश्वराने यहेज्केलला ३९० दिवस पर्यंत त्याच्या डाव्या बाजूवर आणि त्यानंतर ४० दिवस उजव्या बाजूवर झोपण्यास सांगितले.





यहेज्केल हा विचित्र मनुष्य आहे असे कदाचित लोकांनी विचार करायला सुरवात केली असावी. देवाने जे काही त्याला करायला सांगितले ते सर्व त्याने केले. एके दिवशी त्याने मुंडन केले, आणि एक तृतियांश केस अग्निने जाळून टाकले.





त्याने हे यासाठी केले की, जेंव्हा
बाबेलचे सैन्य यरुशलेमेवर
आक्रमण करेल, तेंव्हा तेथे
निर्माण होणाऱ्या रोगराईने आणि
उपासमाराने यरुशलेमेतील एक
तृतियांश लोक मरण पावतील
हे लोकांना सांगावे.



एक तृतियांश लोक, शत्रू सैन्याच्या तलवारीने मारले जातील हे दाखवण्यासाठी यहेज्केलने दुसरे एक तृतियांश केस घेऊन त्यांचे तलवारीने तुकडे तुकडे केले.



आणि शेवटचे एक तृतियांश केस त्यांने हवेत विखरुन टाकले. परंतू त्याचे काही लोक सुरक्षित राहतील आणि परमेश्वर त्यांना अभिवचनाच्या देशात परत आणील याचे चिन्ह म्हणून यहेज्केलने त्यातले काही केस



आपल्या पदरी बांधून घेतले.

यहुदी लोकांनी अपेक्षील्याप्रमाणे परिस्थिती
सुधरणार नाही तर त्याऐवजी ती
अधिक बिकट होत जाईल
असे या धाडसी संदेष्ट्याने
बंदिवासातील यहुद्यांना
सांगितले. लोकांना
यहेज्केलचा राग आला,
परंतू तो देवाचे वचन
बोलतच
गेला,
थांबला नाही.



एके दिवशी तो इस्त्राएलाच्या
वडील जनांसोबत बसला असता,
परमेश्वराने यहेज्केलला एक
दृष्टांत दाखवला. त्या
दृष्टांतात, परमेश्वराने
त्याचे केस (बट) धरुन
त्याला उचलले आणि
यरुशलेमेच्या
मंदिरात
नेले.



मंदिरात परमेश्वराने यहेज्केलला, सरपटणारे प्राणी, अमंगळ पशु, व मुर्त्यां दाखविल्या. या गोष्टी देवाच्या मदिरात कधिच असायला नकोत.



पुढारी देवाऐवजी या गोष्टींच्या भजनी लागले होते. तसेच देवाचे तेज मंदिर सोडून जात आहे आणि ते लवकरच विलयास जाईल हे देखिल देवाने यहेज्केलला दाखवले.



दृष्टांत व्हायचे थांबल्यावर, यहेज्केलने त्याविषयी यहुदी लोकांना सांगितले.



परमेश्वराने जे काही सांगितले ते सर्व खरे ठरले.



यरुशलेमचा नाश करण्यात आला. पुष्कळ लोकांचा नाश झाला. बाबेल देशातील बंदिवासात असलेल्या यहुदी लोकांनी जेंव्हा हे ऐकले, तेंव्हा परमेश्वराने त्याच्या लोकांना कायमचेच सोडून दिले आहे की काय याविषयी त्यांनी आश्चर्य व्यक्त केले.


परंतू देवाने त्याच्या संदेष्ट्याला
अजून दुसरा एक संदेश दिला. त्याने
यहज्केलला सुकलेल्या हाडांच्या
खोऱ्यात
नेले – मनुष्यांची हाडे.

परमेश्वराने यहेज्केलला विचारले, "मानवपुत्रा, ह्या अस्थि सजीव होतील काय?" यहेज्केलने उत्तर दिले, "प्रभू परमेश्वरा, हे तुलाच ठाऊक." सुकलेली हाडे निश्चितच जिवंत होऊ शकत नाही.



परमेश्वर त्याला म्हणाला, "या अस्थींविषयी संदेश देऊन सांग अहो, शुष्क अस्थीनों, परमेश्वराचे वचन ऐका ! तुम्ही सजीव व्हाल." जेंव्हा त्याने देवाने सागितल्याप्रमाणे केले, तेंव्हा त्याला भयंकर आवाज ऐकू आला.

तो आवाज कशाचा असावा असे तुम्हांला वाटते?



तो संदेष्टा पाहात असता विस्मीत झाला, अस्थिंना अस्थि जोडून शरीरे एकत्रित आले.



त्यानंतर, त्यांच्यावर मांस आले.



आणि त्वचेने त्यांच्यावर आच्छादान केले, परंतू त्यांच्यामध्ये श्वास नव्हता.



प्रभूने म्हटले, "मानवपुत्रा, वाऱ्याला संदेश देऊन सांग, हे वाऱ्या तूं चोहों दिशांनी ये व या वधिलेल्यांवर फुंकर घाल म्हणजे ते सजीव होतील." जेंव्हा यहेज्केलने तसे केले तेंव्हा त्यांच्यात श्वास येऊन ते सजीव झाले.



ते जीवंत झाले आणि त्यांच्या पायावर ते उभे राहिले. आता ते खोरे एका मोठ्या सैन्याने भरुन गेले होते. यरुशलेमेचा पाडाव झाला तेंव्हा बाबेलमधिल यहुद्यांनी हताशेचा अनुभव केला होता.



त्याने यहेज्केलच्या दृष्टांताव्द्वारे संदेश पाठविला. तो म्हणाला, "ह्या अस्थिं म्हणजे सर्व इस्त्राएल घराणे आहे, मी तुमच्या ठायी माझा अत्मा घालीन; आणि मी तुम्हांला तुमच्या देशात वसवीन."



परमेश्वराकडून हा किती आशेचा संदेश होता ! त्यानंतर जेंव्हा यहुदी लोक त्यांच्या मातृभूमित परतले तेंव्हा यहेज्केलच्या व्दारे जे देवाने केलेले अभिवचन होते ते



प्रभू परमेश्वराने त्यांना त्यांच्या घरि परत आणले आहे हे त्यांना माहित होते. देवाचे वचन हमेशा खरे ठरते.



यहज्केलः दृष्टांताचा मनुष्य

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

यहज्केल

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

# समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर ईश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची इच्छा अशी आहे की आम्ही त्याला ओळखावे.

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे, पण ईश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याने तुमच्या पापांसाठी शिक्षा मिळावी आणि क्रॉसवर मरण यावे म्हणून त्याच्या एकुलत्या पुत्राला येशूला पाठविले. नंतर येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गातल्या घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

जर हे सत्य आहे यावर तुम्ही
विश्वास ठेवता, तर ईश्वराला हे सांगा:

प्रिय येशू, तू ईश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मृत्यू भोगण्यास मनुष्य बनलास आणि आता तू पुन्हा जगतोस यावर माझा विश्वास आहे.  कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एक दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी निघेन.  तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर.  आमेन.

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!
जॉन 3:16